# मूल्य शिक्षण विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी एक प्रभावी माध्यम

**प्रा. सौ. मेघा मोहन रतकंठीवार**
गृह–अर्थशास्त्र विभाग प्रमुख
यादवराव पोशट्टीवार कला महाविद्यालय
तळोधी( बा.), जि. चंद्रपूर.
megharatkanthiwar@gmail.com

---

***सारांश***

*संस्कार हा शिक्षणाचा अविभाज्य घटक असून विद्यार्थी अवस्थेपासूनच नितीमूल्ये प्रत्येकामध्ये रूजविणे आवश्यक आहे. विकास प्रक्रियेत प्रत्येक क्षेत्रात स्पर्धा आहे आणि या स्पर्धेत टीकून राहण्यासाठी आजची युवापीढी संस्कारक्षम असणे गरजेचे आहे. समाजाची गतिमानता वाढली असून गावातील, राज्यातील लोक स्थलांतरित होत असल्यामुळे समाज संस्कृतीमध्ये बदल झाल्यामुळे मूल्यांचा क्रम देखील बदलत आहे. व्यक्तीगत मुल्याबरोबरच सामाजिक मुल्ये विद्यार्थ्यांमध्ये रूजविणे गरजेचे आहे. वेगवेगळया शिक्षण तज्ञांचे विचार लक्षात घेतले तर सगळयांचा सार शिक्षणातून चारीत्र निर्माण करणे हाच आहे. जीवन विषयक आदर्शाची अभिव्यक्ती ज्यातून होते त्याला मूल्य संबोधले जाते आणि यातूनच चारित्र्यसंपन्न व्यक्तिमत्व निर्माण होते म्हणून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच वर्तमान परिस्थितीत समाजातील वाढता व्यभिचार आणि स्त्रियांवरील अत्याचार थांबवून स्त्रीयांविषयी आदराची भावना निर्माण करण्यासाठी मूल्यशिक्षण अत्यंत गरजेचे आहे आणि त्यासाठी शैक्षणिक अध्यापनात मूल्याधिष्ठित शिक्षण पद्धती उपयुक्त ठरते.*

---

**बीजशब्द –** मूल्य शिक्षण, विद्यार्थी, सर्वांगीण विकास, माध्यम

**प्रस्तावना** :

शिक्षण पद्धती ही नेहमीच परिवर्तनशील असल्यामुळे त्यामध्ये कालसापेक्ष बदल केले जातात. आजच्या जागतिकीकरणाच्या युगात नवे जागतिक संदर्भ लक्षात घेऊन मुल्याधिष्ठित शिक्षण विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उपयुक्त ठरू शकते. स्पर्धेच्या युगात जग असे झाले की, ज्यामध्ये राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक, सामाजिक आणि शैक्षणिक घटकांची व्याप्ती अधिकाधिक वाढली परंतु त्याचवेळी ते सर्व एकमेकांना जोडल्या गेले आहे. समाजाची गतिशीलता वाढल्यामुळे संस्कृतीची देवाणघेवाण होत आहे. म्हणून वर्तमान भारतीय समाजाचा विचार करता मुल्य शिक्षण महत्वाचे आहे. म्हणूनच राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी म्हटले आहे,

ऐसे जीवन आणि शिक्षण । यांचे साधावे गठबंधन ।
प्रथमपासून सर्वांगीण । शिक्षण द्यावे तारतम्ये ।।

भारतीय शिक्षणाबद्दल थोर समाजसुधारक विनोबा भावे यांनी व्यक्त केलेले विचार या ठिकाणी नमूद करावेसे वाटतात त्यांच्या मते, 'भारतीय विद्यार्थी ज्या वेळेस शिक्षण घेत असतो त्यावेळेस तो जीवन जगत नाही, आणि ज्यावेळेस तो जीवन जगण्यास प्रारंभ करतो त्यावेळेस शिक्षण संपलेले असते.' म्हणजेच जीवन आणि शिक्षण यांचा कुठेच संबंध येत नाही हे आजच्या भारतीय शिक्षणपद्धतीला काही प्रमाणात लागू पडते. ज्यांच्याकडून मोठया बदलाची अपेक्षा आहे ती विद्यापीठे केवळ परीक्षा घेणे व पदव्या वाटप यावर जास्त भर देतात. म्हणून या बदलत्या परिस्थितीत काळानुरूप शिक्षणपध्दतीत काही बदल होणे आवश्यक आहे.

**संकल्पना**

**मूल्य –** मूल्य म्हणजे आचरणाचे मापदंड.

**शिक्षण** – प्लेटो यांच्या मते , " सत्य, शिव व सुंदर ही जीवनाची अंतिम मूल्ये आहेत ती समजण्याची व अनुभवण्याची पात्रता मनु यात निर्माण करते ते शिक्षण होय."

**मूल्य शिक्षण –** मूल्यशिक्षण म्हणजे असे शिक्षण ज्यामध्ये मूल्यांना विशेष महत्व दिले जाते. यासाठी शैक्षणिक संस्थांमधील अध्यापनाचे योगदान महत्वाचे आहे. शिक्षण समाजपरिवर्तनाचे प्रभावी साधन असल्यामुळे विद्यार्थ्यांचे शिक्षण सुरू असतांनाच समाजाच्या विकासाच्या दृष्टीने मूल्यशिक्षण देणे गरजेचे आहे. १९९७–१९९८ पासून शालेय स्तरावर १ ली ते १० वी साठी मूल्यशिक्षण हा विषय अनिवार्य करण्यात आला आहे. यासाठी महाराष्ट्र शासनाने खालील दहा मूल्ये निश्चित केली आहेत.

1. राष्ट्रभक्ती
2. राष्ट्रीय एकात्मता
3. सर्वधर्म सहिष्णुता
4. स्त्री–पुरूष समानता
5. श्रमप्रतिष्ठा
6. वैज्ञानिक दृष्टिकोन
7. सौजन्यशीलता
8. संवेदनशीलता
9. वक्तशीरपणा
10. नीटनेटकेपणा

वरील मूल्यांमधून व्यक्तीविकास, समाजविकास आणि राष्ट्रविकास यांची मोठया प्रमाणात विद्यार्थ्यांमध्ये रूजवणूक करता येते. महाविद्यालयीन स्तरावर देखील मूल्यशिक्षण देणे आधुनिक काळात आवश्यक आहे.

**सर्वांगीण विकास** – व्यक्तीचा सर्वांगीण विकास म्हणजे केवळ त्याचे दिसणे नसून त्यामध्ये शारीरिक, मानसिक, भावनिक आणि आध्यात्मिक बाबी तसेच त्याचे स्वत:शी व इतरांशी असलेले वर्तन यांचा समावेश होतो.

**अध्ययनाची उद्दिष्टे –**

१. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात मूल्य शिक्षणाचे महत्व स्पष्ट करणे.

२. मूल्यशिक्षणाच्या कार्यवाहीसाठी उपयुक्त मार्ग सूचविणे.

**अध्ययन पद्धती**

प्रस्तुत शोध निबंधासाठी दुय्यम स्त्रोता अंतर्गत अध्ययन विषयासंबंधीत ग्रंथ व लेखाचा तथ्य संकलना करिता वापर करून माहीती संकलित करून वर्णनात्मक स्वरूपात मांडणी केली आहे.

**शिक्षणातून मूल्ये रूजवण्याची गरज**

१. समाजातील सर्वच क्षेत्राचा विचार करता मूल्यांचा वाढता ऱ्हास यामुळे सामाजिक वातावरण दूषित होत आहे. त्यामुळे युवा पीढीमध्ये मूल्यांचे जाणीवपूर्वक संक्रमण करणे आवश्यक नव्हे तर अनिवार्य झाले आहे.

२. संस्कारक्षम व्यक्तिमत्व मुल्यांच्या संक्रमण संवर्धनातून साकार होऊ शकते.
३. भारतीय म्हणुन आपली अस्मिता टिकवून ठेवायची असेल तर आवश्यक त्या मूल्यांची रूजवणूक आणि जोपासना करणे गरजेचे आहे.
४. भारतासारख्या भिन्न धर्म, पंथ, भाषा, संस्कृती असलेल्या देशात विविधतेतील एकात्मता साध्य करण्यासाठी मूल्यशिक्षण उपयुक्त आहे.
५. मूल्यांच्या रूजवणुकीतून जबाबदार नागरिक निर्माण करता येतात.
६. रॅगिंगचे वाढते प्रमाण कमी करण्यासाठी संवेदनशीलता, सद्सद्विवेकबुद्धीची जोपासना विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण करण्यासाठी मूल्यशिक्षण आवश्यक आहे.
७. 'हे विश्वची माझे घर' अशी विश्वव्यापक दृष्टी निर्माण करण्यासाठी मूल्यशिक्षण उपयुक्त ठरते.
८. वर्तमान परिस्थितीत समाजातील वाढता व्यभिचार आणि स्त्रियांवरील अत्याचार थांबवून स्त्रीयांविषयी आदराची भावना निर्माण करण्यासाठी मूल्यशिक्षण अत्यंत गरजेचे आहे.
९. पालक व गुरूजनांविषयी आदरभाव वाढविण्यासाठी सौजन्यशीलता हे मूल्य जोपासणे आवश्यक आहे.
१०.मानवी मुल्यांवर श्रद्धा निर्माण करणे मूल्यशिक्षणातूनच साध्य करता येते.
११.जीवनातील अपयश, नैराश्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये वाढत जाणारी हिंसक प्रवृती, व्याभिचार, व्यसनाधीनता इ. समस्यांना सामोरे जाण्याचे सामर्थ्य विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करण्यासाठी उत्तम मार्गदर्शक म्हणून देखील मूल्य शिक्षण महत्वपूर्ण ठरते.

**मूल्यशिक्षणासाठी उपयुक्त मार्ग –**

आध्यात्मिक ग्रंथात प्राचीन काळातील ऋषी मुनींपासून ते आधुनिक विचारवंत व शिक्षणतज्ज्ञांपर्यंत सर्वांनी मूल्यशिक्षणाचे महत्व सांगीतले आहे. या मूल्यांची रूजवणूक विद्यार्थ्यांमध्ये करण्यासाठी खालील मार्ग उपयुक्त ठरू शकतात.

१. देशाला स्वातंत्र्य मिळवुन देण्यासाठी असंख्य क्रांतिकारकांनी बलिदान दिले त्याचे स्मरण ठेवून त्याच्या जयंत्या व पुण्यतिथी, राष्ट्रीय सण साजरे करावे यातून स्वातंत्र्य, स्वाभिमान व राष्ट्रभक्ती यांची रूजवणुक होते.
२. निरक्षर गरीब व अज्ञानी लोकांमध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी त्यांची परिस्थिती दु:खे, समस्या समजून घेऊन ते दुर करण्यास विद्यार्थ्यांना समजून सांगण्यासाठी प्रयत्नशील असावे.
३. स्वच्छता व शिस्तीचे पालन करण्यास शिक्षकाने स्वत:च्या वर्तनातून शिकवावयास हवे. यासाठी भारताचे विद्यमान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेले स्वच्छता अभियान अंमलात आणणे आवश्यक आहे.
४. सामाजिक जाणीव निर्माण होण्यासाठी परिपाठाचे आयोजन करून यामध्ये प्रार्थना, राष्ट्रगीत , वार्ता, वार्तेचे स्पष्टीकरण, सुविचारकथन, संस्कारकथा इ. चा समावेश करावा.
५. विविध सांस्कृतिक कार्यक्रम व उपक्रम यामध्ये मूल्यांवर आधारित चित्रकला निबंध, वक्तृत्व, व्यक्तिगत व समुह गीतगायन हस्तलिखितांची निर्मिती, भित्ती पत्रके इ. चे आयोजन करावे.
६. मुल्यशिक्षण प्रभावी करण्यासाठी शिक्षकाने स्वत:चे व्यक्तिमत्व सद्गुसंपन्न बनवावे यासाठी प्रथम स्वत: मूल्य आचरणात आणावीत.

७. सांस्कृतिक व ऐतिहासिक स्थळाना भेटी देण्यासाठी शैक्षणिक सहलीचे आयोजन करावे.

८. वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करण्यासाठी विज्ञान छंद मंडळाची स्थापना करून विज्ञान व वैज्ञानिक यांवर प्रदर्शने भरवावी.

९. स्त्री–पुरूष समानता बाळगण्यासाठी वर्गातून सुरूवात करावी.

१०.सर्वधर्म सहिष्णुता निर्मितीस पोषक वातावरण शैक्षणिक परिसरातून निर्माण करावे जसे विविध धर्मीय सण सामुहिकरित्या साजरे करणे.

११.वक्तशीर, स्वच्छ व नीटनेटक्या वर्गास आणि विद्यार्थ्यांस विशेष पुरस्कार द्यावे.

१२.मोबाईल संस्कृती, संगणक व इंटरनेटच्या मायाजाळात मुले गुरफटत चालली आहे. त्यांच्यासमोरील धोक्याची कल्पना त्यांना नाही. आजची पीढी संगणकाला इतक्या यशस्वीपणे हाताळतात तितका पालकवर्ग हाताळू शकत नाही. त्यामुळे कधीकधी याच्या उपयोगाने गंभीर स्वरूपाचे वळण घेतले जाते. यासाठी विद्यार्थ्यांना शिक्षणातून योग्य मार्गदर्शन करावे.

**निष्कर्ष :**

मूल्यशिक्षण हा फक्त शाब्दिक माहितीचा विषय नसून प्रत्यक्ष कृती व आचरणाचा विषय आहे. उद्‌बोधणाचा व जाणीवजागृतीचा विषय आहे. तो विचार वाणी आणि कृतीतून प्रगट होणे आवश्यक आहे. ज्ञानमंदिर हे प्रभावी संस्कार केंद्र आहे. आजच्या स्पर्धेच्या व जागतिकीरणाच्या युगात भरकटलेल्या भावी पिढीला सावरण्यासाठी बालमनावर मूल्यांची रूजवणूक झाली तर दुराचार आणि दुर्गुण, कौर्य आणि कामुकता, लालसा, लाचारी, आणि शोषण यांनी दूषित झालेल्या विषमय सामाजिक वातावरणापासून पंख फुटल्या पिलांना वाचविता येईल. विश्वाची वाटचाल शांततेने होण्यासाठी जीवनाला समृद्ध आणि श्रीमंत करणारे शाश्वत संस्कार अन् मूल्य यांचे बिजारोपण करणे काळाची गरज आहे. म्हणूनच तुकडोजी महाराज म्हणतात,

“त्या कोवळया कळयांमाजी, लपले ज्ञानेश्वर, रवींद्र, शिवाजी
विकासात प्रकटतील समाजी, शेकडो महापुरूष ।।”

शिक्षणव्यवस्थेतील मूल्याधिष्ठित शिक्षणाला प्राधान्य दिल्यास राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, स्वामी विवेकानंद, डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम, विनोबा भावे यांनी सुचविलेल्या शिक्षणाने विद्यार्थी जीवनाशी योग्य सांगड घातल्याने आणि विद्यार्थ्यांनी त्याचा अंगीकार केल्यास विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधने शक्य होईल.

**संदर्भ सूची :**


1. येलमटे, अनिता. ‘शांततेसाठी शिक्षण – काळाची गरज’. शिक्षण संक्रमण, अंक ३ सप्टेंबर २०१४, पृ १७.
2. कवाडे, सोनाली व कडेकर, प्रशांत. ‘जागतिकीकरणात मुल्याधिष्ठित शिक्षण आणि शिक्षक प्रशिक्षणाचे महत्व’ शिक्षण संक्रमण, अंक ९ फेब्रुवारी २०१२, पृ. ४०.
3. पाटील, शोभा, ‘शाळेत समाजः समाजात शाळा’, शिक्षण संक्रमण , अंक २, ऑगस्ट २०१३, पृ ७५.
4. देशमुख, उषा, ‘त्याचे भविष्य आपुल्या हाती’ साप्ताहिक विवेक (हिंदुस्थान प्रकाशन संस्था) मुंबई.